IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# कोकणा / कुकणा/ कोकणी आदिवासी जमात

**Shri. Mahale Madhu Bavaju**
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar, (Burli)Tal-Palus, Dist-Sangli

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*आदिवासी जमात, इतिहास लेखनातील अभाव*

**ABSTRACT**

सबअल्टर्न इतिहास लेखन हे मुख्य धारेच्या ऐतिहासिक कथानांमध्ये दडपल्या गेलेल्या, उपेक्षित किंवा गौण समजल्या गेलेल्या सामाजिक समूहांच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवते. कोकणातील आणिविशेषतः कोकणा/ कुकणा/ कोकणी आदिवासी समाजातील सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन, आर्थिक घडामोडी, स्थलांतर, धार्मिक संपर्क आणि आधुनिकतेचे प्रवाहयांचा अभ्यास सबअल्टर्न दृष्टीकोनातून केला तर त्यांच्या इतिहासातील 'मूक' आवाज उलगडतात. प्रस्तुत संशोधन-निबंधात कोकणा कुकणा/ कोकणी आदिवासींच्या जमाती इतिहास लेखनातील अभाव, ओळख-राजकारण, सांस्कृतिक परंपरा, तसेच बदलत्या विकास-मॉडेलचा परिणामयांचे विश्लेषण केले आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Mahale, M. B. (2025). कोकणा / कुकणा / कोकणी आदिवासी जमात. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(VI), 1921–1927.

## १. प्रस्तावना (Introduction)

भारतीय इतिहास लेखनाचा दीर्घकाळ 'राजकीय-एलिट' केंद्रित दृष्टीकोन राहिला. रामचंद्र गुहा, रणजीत गुहा, शाहिद अमीन यांसारख्या इतिहासकारांनी सबअल्टर्न अभ्यासाद्वारे उपेक्षित समाजांचे अनुभव इतिहासाच्या केंद्रस्थानी आणले. कोकणातील आदिवासी समाज—विशेषतः कोकणा (कुकणा/कोकणी आदिवासी जमातीयांच्या इतिहासाचे दस्तावेजी करण मर्यादित राहिल्यामुळे त्यांचा सामाजिक प्रवास, संघर्ष आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे परिमाण अद्याप पूर्णपणे प्रकाशात आलेले नाही. या संशोधनाचा उद्देशाने तुटलेल्या इतिहासाच्या धाग्यांना सबअल्टर्न चष्म्यातून पुन्हा बांधणे हा आहे.

## २. सबअल्टर्न इतिहासाची संकल्पना (Concept of Subaltern History)

सबअल्टर्न' म्हणजे काय?: 'सबअल्टर्न' हा शब्द मूळतः सैन्यातील कनिष्ठ अधिकाऱ्यांसाठी वापर लाजात असे. परंतु या संकल्पनेत तो समाजशास्त्री संदर्भात वापर लागेला. याचा अर्थ असा होतो की, समाजातले लोक वर्चस्वशाली गटांच्या (Elite Groups) तुलनेत दुय्यम, कनिष्ठ किंवा सत्तेपासून वंचित आहेत, ते 'सबअल्टर्न' होत या मध्ये शेतकरी, कामगार, आदिवासी, स्त्रियाआणि इतरअल्पसंख्याक समूहांचा समावेश होतो.

मुख्य प्रवाहातील इतिहासाला आव्हान: पारंपरिक इतिहासलेखन सहसा राजे, नेते, सरकारे आणि उच्चभ्रू वर्गाच्या कार्यांवर आणि निर्णयांवर केंद्रित असते. सबअल्टर्न इतिहास लेखनयाला आव्हान देते आणि असा युक्तिवाद करते की खरा इतिहास समजून घेण्यासाठी सामान्य लोकांच्या अनुभवांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

तळागाळातील दृष्टिकोन: ही संकल्पना इतिहासाकडे 'वरतून- खाली' (Top-Down) न पाहता' खालून-वर' (Bottom-Up) पाहण्याचा आग्रह करते. सामान्य लोक त्यांच्या स्वतःच्या जीवनावर आणि सामाजिक परिस्थितीवर कसा परिणाम करतात, हे समजून घेणे महत्त्वाचे मानले जाते.

'सबअल्टर्न स्टडीज ग्रुप':या संकल्पनेचा उदय प्रामुख्याने दक्षिण आशियाई संदर्भात, विशेषतः भारतात झाला. १९८० च्या दशकात रणजित गुहा (Ranajit Guha) यांच्या नेतृत्वाखाली इतिहासकारांच्या एका गटाने 'सबअल्टर्न स्टडीज' (Subaltern Studies Group) चळवळ सुरू केली.

**सबअल्टर्न स्टडीजचे मूलभूत तत्त्वे:**

अधिकृत इतिहासाला प्रश्न विचारणे.लोक साहित्य, मौखिक परंपरा, सांस्कृतिक प्रातिनिधिक यांना महत्त्व देणे. उपेक्षितांच्या प्रतिकाराच्या स्वरूपांचा शोध घेणे. कोकणा (कुकणा/कोकणी आदिवासी समाजाच्या संदर्भात ही पद्धत उपयुक्त ठरते कारण त्यांचा इतिहास प्रशासनिक कागद पत्रांत फारसा आढळत नाही; त्यांचे अनुभव 'ओरल हिस्टरी' आणि सांस्कृतिक लोक जीवनातूनच उजेडात येतात.

## ३. कोकणा /कुकणा/ कोकणी जमाती भूगोल आणि उत्पत्ती
## (Background of the Kokna Adivasis)

कोकणा समाजाचे महाराष्ट्रातील वास्तव्य नाशिक, ठाणे, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यां मध्ये आहे, तर गुजरात राज्यात डांग, नवसारी, धरमपूर, सुरत या जिल्ह्यां मधून तसेच दादरा नगर हवेली वास्तव्य करणाऱ्या कोकणा ही एक आदिवासी जमात आहे. प्राध्यापकबी. ए. देशमुख यांच्यामता नुसार रत्नागिरी परिसरात, समुद्र किनारपट्टी लालागून आर्य येण्यापूर्वी 'कुंकण' नावाचे नाग कुल वास्तव्य करीत होते. ते मोठे पराक्रमी कूल होते आणि या कुंकण कुलाच्या काही तरी चिरस्मरणीय कामगिरीमुळेच या प्रांताला कोंकण हे नाव पडलेले असून, म्हणूनच "कुंकण"कुलाचे वारसदार म्हणजे आजचे कोकणा-कोकणी आदिवासी असावेत. आजबरेच कोकणा हे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत. भाषा: कोकणांची प्राथमिक भाषा कोकणी आहे, ही कोंकणीउपसमूहातील इंडो-आर्यन भाषा आहे. भारताच्या पश्चिम किनाऱ्या वरील अनेक वस्त्या कोकणी भाषा बोलतात, जी बोली भाषा म्हणून ओळखली जाते. अनेक कोकणा जमातीचे सदस्य मराठी, महाराष्ट्राची राज भाषा, तसेच इतर स्थानिक आणि प्रादेशिक भाषांमध्ये ही पारंगत आहेत. औद्योगिकी करण आणि शाळां सारख्या औपचारिक संस्थां मध्ये प्रमाणित भाषांच्या संवर्धनामुळे

कोकणी जमाती कोकणी आणि इतर स्थानिक भाषांचा वापर गमावत आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. कोकणी भाषा आणि कोकण सांस्कृतिक वारशाच्या इतर पैलूंचेजतन आणि संवर्धन केले जात आहे, विशेषतःलेखन, संगीतआणि सांस्कृतिकअभिव्यक्तीच्या इतर प्रकारांमध्ये भाषेचा वापर करून. कुकना बोली (मराठी–गुजराती मिश्रित)परंपरा: नृत्य-गीत, धार्मिक विधी, भुताई/देवक पूजा, हंगामी उत्सव उपजीविका: पूर्वी शिकार व संकलन; नंतर शेती, वन-आधारित रोजगार, प्लँटेशन कामे. कोकणा- कुकणा/कोकणी आदिवासी आर्थिक स्थिती सांगताना शेती हा मूळ व्यवसाय असला तरी ४० टक्के कोकणा भूमि हीन आहेत. काबाड कष्ट करणार्या या समाजाला अन्नधान्य संचय किंवा बचती ची सवय नाही; पर्यायाने आर्थिक हलाखीला पारावार नाही, हे दिसून येते.

कोकणा (कुकणा/ कोकणी आदिवासी जमाती च्या राजकीय स्थिती संबंधी अनास्था असली तरी राजकीय भवितव्या विषयी लेखक आशावादी दृष्टि कोन मांडतात. कारण या समाजाला त्यांच्या गतराजकीय कतरृत्वा विषयी अज्ञान असून, या समाजाती लतरुणांनी राजकीय इतिहास अभ्यास केला तर त्यांनात्या पासून निश्चित प्रेरणा मिळूशकेल,असे मला वाटते . सुरगाणा, धरमपूर, वासंदा या काही ठिकाणी स्वातंत्र्यमिळे पर्यंत कोकणाची स्वतंत्र संस्थाने होती, हा ताजा इतिहास आहे.कोकणा /कुकणा/ कोकणी आदिवासी जमातीच्या शैक्षणिक स्थिती आणि समस्यां संबंधी सविस्तर ऊहापोह करताना स्वातंत्र्य पूर्वकाळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ, अशा दोन विभागांत ही चर्चा करतात. विशेषत: नाशिक आणि नंदुरबार सह धुळे जिल्ह्यातील कोकणाच्या शैक्षणिक स्थितीसंबंधी लिहिताना अपुर्या शैक्षणिक सोई सुविधा, आदिवासी जीवन संस्कृतीला अभ्यासक्रमात स्थान नसणे, उदासीन सरकार, भ्रष्ट नोकरशाही, आस्था ही नव सेवाव्रती शून्य आणि सुमार दर्जाचे शिक्षक, उपजीविकेची साधने आणि आदिवासी शिक्षण अपुर्या शैक्षणिक सोई सुविधा.

**४. कोकणा /कुकणा/ कोकणी जमातीचे सबअल्टर्न स्वरूप:-**

कोकणा इतिहासामध्ये वसाहतवाद, जंगल कायदे, जमीनदारी पद्धती, मिशनरी संपर्क, स्वातंत्र्योत्तर विकास धोरणे या सर्वांचा प्रभाव दिसतो.उपेक्षितत्वाचे पैलू:- जमीन मालकीचा अभावशिक्षण आणि आरोग्यसेवे पासून वंचितता वन कायदे आणि विस्थापन सांस्कृतिक उपहास व मुख्य प्रवाहातील अदृश्यता या सर्वांनी त्यांना सबअल्टर्न स्थितीत ढकलले.

**५. परिवर्तनाचे टप्पे (Phases of Transformation)**

**१) वसाहतवादी काळातील बदल**

जमीन हक्कां वर परिणाम: ब्रिटिशांनी जमीन महसूल प्रणाली (उदा. कायम धारा पद्धत) सुरू केली, ज्यामुळे जमिनीची पारंपारिक सामूहिक मालकी संपुष्टात आली. आदिवासींना त्यांच्या जमिनीवर कर भरावा लागला, जोते अनेक कारणा मुळे भरू शकत नव्हते. यामुळे सावकार आणि जमीनदार यांच्याकडे जमिनीग हाण गेल्या आणि आदिवासी भूमिहीन मजूर बनले.

वन कायद्यांमुळे जीवन शैलीत बदल: ब्रिटिश सरकारने वनकायदे (उदा. इंडियन फॉरेस्ट ॲक्ट १८६५ आणि १८७८ ) लागू केले, ज्या मुळे जंगलांना 'सरकारी मालमत्ता' घोषित करण्यात आले.आदिवासींच्या जंगलातील प्रवेशावरआणि संसाधनांच्या वापरांवर बंधने आली. त्यांच्या पारंपारिक स्थलांतरित शेती , शिकार आणि वनोत्पादने गोळा करण्याच्या पद्धतींवर बंदी घालण्यात आली.यामुळे आदिवासींना त्यांच्या उपजीविकेच्या मुख्यस्त्रो तापासून वंचित राहावे लागले आणि त्यांना मजुरीसाठी इतरत्र स्थलांत रकरण्यास भाग पाडले गेले.

प्रशासकीय आणि राजकीय स्वायत्ततेचा ऱ्हास: पारंपारिक कोकणा (कुकणा/ कोकणी आदिवासी जमाती समाजातील प्रमुखांचे (सरदार/मुखिया) प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार कमी झाले.त्यांना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी बनवलेले कायदे पाळण्यास भाग पाडले गेले आणि ब्रिटिशांना कर द्यावा लागला. यामुळे जमातीमध्ये त्यांची पारंपारिक प्रतिष्ठा आणि अधिकार कमी झाले.

आर्थिक शोषण आणि सक्तीचे मजूर: ब्रिटिश सरकार धोरण पैशावर आधारित अर्थव्यवस्था सुरू झाल्या मुळे सावकार, व्यापारी आणि मध्यस्थांचे शोषण वाढले.त्यांचा परीणाम कोकणा (कुकणा/ कोकणी आदिवासी जमाती आदिवासींना रेल्वे बांधकाम, खाणी आणि Plantations मध्ये सक्तीने (बिगार) काम करण्यास भाग पाडले गेले.

सांस्कृतिकबदल: ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रभावा मुळे आणि वसाहतवादी शिक्षण पद्धतीमुळे आदिवासींच्या पारंपारिक संस्कृती, धर्म आणि जीवन शैलीव रपरिणाम झाला .या बदलांमुळे आदिवासींमध्ये असंतोष पसरला आणि अनेक ठिकाणीत्यांनी ब्रिटिश धोरणां विरुद्ध बंड केले आणि प्रतिकार केला स्वातंत्र्योत्तर विकास धोरणे.

**२) आधुनिकता व सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन:**

कोकणा/कुकणा/ कोकणी आदिवासी जमात ही मातृ सत्ताक समाज रचनेची शैली समाजातील स्त्रियांच्या भूमिकेवर जोरदार भर देते. कोकणांचे त्यांच्या कुटुंबांशी आणि समुदायांशी खोलवर संबंध आहेत आणि ते एकमेकांच्या सहकार्याचा आणि समर्थनाचा खूप आदर करतात. दारिद्र्य आणि समाजाच्या मुख्य प्रवाहातून वगळण्या सारख्या अडथळयांना नजुमानता कोकणा समाजाने आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्याचे काम केले आहे. त्यांच्या परंपरा आणि चालीरीती त्यांच्या जीवनाचा आणि समुदायाचा महत्त्वाचा भागबनून राहिल्या आहेत. शैली आणि पोशाख- कोकणा जमाती चा एक विशिष्ट ड्रेस कोड आणि पारंपारिक पोशाख आहे जो समूहाचा इतिहास आणिओळख दर्शवतो. शंख, मणी आणि नाणी यासारख्या प्रादेशिक घटकांपासून बनवलेल्या दागिन्यांच्या व्यतिरिक्त, कोकणा महिलांच्या पारंपारिक पोशाखात अनेकदा साडी,लुगडी,फडकी असतात. फडकी, स्त्रीच्या अस्मितेचे आणि समाजात उभे राहण्याचे महत्त्व पूर्णप्रतीक, वारंवार चमकदार रंगीत आणि उत्कृष्ट रचना आणि नमुन्यांनी सुशोभित केलेली असते.कोकणातील पुरुष त्यांच्या पारंपारिक पोशाखाचा एक भाग म्हणून धोतर घालतात, जो कंबरेला आणि पाया भोवती परिधान केलेला एक लांब पोशाख आहे, तसेच पगडी किंवा डोक्यावर फेटा आहे. सामान्यतः पांढरा किंवा मलईरंगाचा, धोतर वारंवारभरत काम किंवा इतरदागिन्यांनी सजलेला असतो. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की आधुनिक पोशाख हळूहळू कोकणा/कुकणा/ कोकणी आदिवासी जमातीच्या पारंपारिक पोशाखाची जागा घेत आहे, विशेषत: तरुण पिढीमध्ये. पारंपारिक पोशाख अजून ही परिधान केला जातो, तरीही, आणि कोकणा समुदायाच्या सांस्कृतिक भूत काळाचे महत्त्वपूर्ण प्रतिनिधित्व आहे.खाद्य – कोकणात प्रादेशिक संस्कृती आणि वातावरणाचा प्रभाव असणारा एक खास पाककृती आहे. नगली, तांदूळ, उडीद ,हंगामनुसार भाजीपाला , फळे उदा. पाउसाळ्याच्या सुरवातीला तेरा, सेवळा ,कदमुळे , भोकरा भाजी ईत्यादी फळे- अळवे ,तोरण ,करवंद ,जांभूळ ,मेका ,करटोळे ,आवळे इ . स्थानिक उत्पादन हे त्यांच्या पारंपारिक शाकाहारी आहाराचे मुख्यभाग आहेत. याव्यतिरिक्त, कोकणाच्या आहारा मध्ये सीफूड महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, विशेषत: किनार पट्टीच्या प्रदेशां मध्ये जेथे मासेमारी हाउत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्रोतआहे.लागलीची भाकरी,व तांदळाच्या पिठापासून बनवलेल्या फ्लॅटब्रेडचा एक प्रकार, वरण आणि आमटी यासारखे तांदूळ-आधारित पदार्थ हे लोक प्रिय कोकणा चेपदार्थ (मसालेदार उडीद सूप) आहेत. भरीत (भरीत वांगी), सोलकडी (कोकमच्या फळा पासून बनवलेले एकज्वलंत, आंबट पेय) आणि आम रसही शाकाहारी पाककृतीची उदाहरणे आहेत.

## ६. सबअल्टर्न दृष्टीकोनातून कुकना अनुभवांचे विश्लेषण

**१) मौखिक इतिहास (Oral Histories)**

कोकणा (कुकणा) आदिवासींचा मौखिक इतिहास म्हणजे सातपुडा पर्वत रांगेत पसरलेल्या याजमातीची स्थलांतरे, पराक्रम आणि परंपरा सांगणाऱ्या अनेक आख्यायिकाआणि कथां मधून जतन झालेला इतिहास आहे, ज्यात 'कुंकण' कुळाचा वारसा, डोंगराळ भागातील राजांचे राज्य आणि मराठा व मुघलांच्या स्वारीत ही टिकून राहणे यांसारख्या गोष्टींचा समावेश आहे, जे त्यांच्या 'कोकणी' भाषेतून आणि सांस्कृतिक प्रथां मधून आजही जिवंत आहेत.

मौखिक इतिहासाची प्रमुख वैशिष्ट्ये:

या जमातीचे नाव 'कोकणा' हे कोकण प्रदेशातून आले असावे, असे मानले जाते. काही कोकणा लोकआजही कोकणात राहतात, तर अनेक लोक डोंगराळ भागात स्थलांतरित झाले. १४ व्याशतकातील दुष्काळामुळे कोकणांनी उत्तरेकडे स्थलांतर केले, अशी एक कथा आहे, ज्यामुळे ते नाशिक, धुळे, जव्हार, डाग जिल्हा अहवा,वासदा ,धरमपूर ,दादर नगर हवेली यांसारख्या भागांत स्थायिक झाले. 'कुंकण' कुळाचा वारसा (पराक्रमाची गाथा):'कुंकण' हे एका पराक्रमी कुळाचे नाव होते आणि त्यांच्या चकामगिरीमुळे याप्रदेशाला 'कोकण' हे नाव पडले असावे, अशी त्यांची धारणा आहे. त्यामुळे कोकणा आदिवासी स्वतःला 'कुंकण

कुळाचे वारसदार' मानतात.

सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन: त्यांची भाषा 'कोकणी' (मराठी आणि गुजराती मिश्रित) आहे, जी त्यांच्या संस्कृतीचा भाग आहे. शेती आणि मासेमारी हे त्यांचेपारंपरिक व्यवसाय आहेत. त्यांचे सण-उत्सव, पारंपरिक वेशभूषा (धोतर, फेटा) आणि भाकरी-आमटी सारखे खाद्य पदार्थ त्यांच्या मौखिक परंपरेचा भाग आहेत.अलीकडच्या काळात कोकणा समाजाच्या या पारंपरिक इतिहासाचे आणि संस्कृतीचे संवर्धनकरण्याचे प्रयत्न सुरू आहेत, जेणे करून ही मौखिक माहिती भविष्यासाठी जपली जाईल. थोडक्यात, कोकणा आदिवासींचा मौखिक इतिहास हा त्यांच्या स्थलांतराच्या कथा, शौर्याचे किस्से आणि निसर्गाशी जोडलेल्या जीवन शैलीतून साकारला आहे, जो पिढ्यान पिढ्या मौखिक परंपरेतून पुढे येत आहे.

निसर्ग आणि कृषी जीवनातील आव्हाने: कोकणा समाज प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असल्याने, त्यांची अनेक गीते आणि कथा कथन निसर्गाच्या शक्तीं बद्दल आहेत. 'कणसारी' देवीची कथा (धान्याचीदेवी) यातून दिसून येते, दुष्काळ किंवा नैसर्गिक आपत्तींच्या वेळी देवी तिला प्रसन्न केल्यावर पुन्हा समृद्धी येते. ही कथा निसर्गाच्या अधीन राहून जगणाऱ्या समाजाचा संघर्ष दर्शवते.

सामूहिक जीवन आणि सामाजिक बांधिलकी: कोकणा नृत्ये (उदा. पावरी नृत्य किंवा माढोळ नृत्य, ढोल नृत्य) आणि सण-उत्सव (उदा. डोंगऱ्या देव उत्सव) हे संपूर्ण समुदाय एकत्र येऊन साजरे करतात. यातून त्यांच्यातील एकजूटआणि सामाजिक बांधिलकी दिसून येते, जी बाहेरील आव्हानां विरुद्ध लढण्याचे एक छुपेबळ आहे.

मौखिक परंपरा आणि सांस्कृतिक जतन: अनेक आदिवासी संस्कृतींप्र माणेच, कोकणा/ कुकना जमाती मध्ये ज्ञान आणि इतिहास मुख्यत्वे मौखिक कथा कथन आणि लोक गीतांद्वारे पुढील पिढ्यां पर्यंत पोहोचवला जातो. ही मौखिक परंपरा, शहरीकरण आणि आधुनिकी करणामुळे त्यांच्या संस्कृतीवर होणाऱ्या परिणामां विरुद्ध (सांस्कृतिक लोप होण्याचा धोका) प्रतिकाराचे एकम हत्त्वाचे साधन आहे.

**७) दैनंदिन प्रतिकार (Everyday Resistance)**

**१. वन कायद्यां विरुद्ध सामूहिक शेती आणि हक्क चळवळी:-**

ऐतिहासिक दृष्ट्या, वनांवर अवलंबून असलेल्या आदिवासी समाजाला ब्रिटिश कालीन आणि स्वातंत्र्योत्तर काळातील वन कायद्यांमुळे आपल्या पारंपारिक हक्कां पासून वंचित राहावे लागले. याअन्याया विरुद्ध कोकणा/कुकना समाजाने खालील प्रकारेसंघर्ष केला:पारंपारिक सामूहिक शेतीचे रक्षण: आदिवासींची 'फिरती शेती' (Slash-and-burn cultivation) किंवा पारंपरिक शेती पद्धती वन कायद्यां नुसार बेकायदेशीर ठरवण्यात आल्या. या विरुद्धत्यांनी आपल्या सामूहिक शेतीच्या (Community Farming) हक्कासाठी लढा दिला.

'वन हक्क कायदा २००६' (Forest Rights Act - FRA): हा कायदा कोकणा/कुकना समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. या कायद्यांतर्गत त्यांनीवैयक्तिक आणि सामुदायिक वनहक्कासाठी दावेदाखल केले. अनेक ठिकाणी त्यांनी एकत्र येऊन आपल्या जमिनीचे नकाशे तयार केले आणि ग्राम सभांच्या माध्यमातून वन जमिनीवरचा आपला अधिकार प्रस्थापितक करण्यासाठी लढा दिला.जंगल सत्याग्रह: काही प्रदेशांमध्ये, विशेषतः महाराष्ट्रातील नाशिक, ठाणे आणि गुजरात सीमेवरील पेठ ,सुरगणा,कळवण, इ. भागात, आदिवासींनी वन विभागाच्या निर्बंधां विरुद्ध शांतता पूर्ण जंगल सत्याग्रह केले, जिथे त्यांनी सामूहिकरित्या जंगलातील संसाधने गोळाकरण्याचा आपला हक्क सांगितला.आज अखेर अनेक प्रकाणे , द्यावे पडून आहेत. आदिवासी जमिनीवर हक्क दिले नाहीत माजी आमदार जिवा पडू गावीत अनेक वर्ष संघर्ष करीत आहेत. अधिकारी सरकारे बदले की आदिवासीना जमिनीवर हक्क दिले नाहीत ही आज परिस्थिति आहे.

**२. पेसा (PESA) आणि वनाधिकार चळवळी:-**

पंचायत (अनुसूचित क्षेत्रां पर्यंत विस्तार) अधिनियम, १९९६' (PESA Act) आणि वनाधिकार चळवळी याकोकणा/कुकना समाजाच्या स्वशासनाच्या आणि संसाधनावरील नियंत्रणाच्या लढ्यासाठी केंद्रस्थानी होत्या. ग्रामसभेचेसक्षमीकरण पेसा कायद्याने आदिवासी बहुल क्षेत्रांमध्ये ग्रामसभेला महत्त्वाचे अधिकार दिले. याचळवळींमुळे कोकणा/कुकना समाजात ग्रामसभेच्या अधिकारांबद्दल जागरूकता निर्माण झाली.जल, जंगल, जमीन यावर नियंत्रण: पेसा आणि

वना अधिकार चळवळींच्या माध्यमातून त्यांनी आपल्या क्षेत्रातील गौण वनोपजा वर (Minor Forest Produce) आणि स्थानिक संसाधनांवर ग्रामसभेचा अधिकार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

शिक्षण-अधिकार चळवळीतील सहभाग:- शिक्षणाच्या माध्यमातून सक्षमीकरण आणि विकासाच्या मुख्यप्रवाहात सामील होणे हा कोकणा/कुकना जमातीच्या चळवळींचा अविभाज्य भागआहे: आश्रमशाळा आणि सुविधा शासकीय आश्रमशाळांमध्ये योग्य अमलबजावणी करणे, शिक्षकांना नियमित वेतन मिळवून देणे आणि विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पुरवणेयासाठी त्यांनी स्थानिक पातळीवर आंदोलने केली.

शिक्षणाचे माध्यम भाषिक आणि सांस्कृतिक अस्मिता जपण्यासाठी, शिक्षणाचे माध्यम स्थानिक बोली भाषेत असावे, यासाठी काही संस्थांनी आणि कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.स्थानिक भाषा आणि पुस्तकी भाषा यामध्ये फरक आहे. जागरूकता आणि सक्षमीकरण शिक्षणामुळेआदिवासी तरुणांमध्ये आपल्या संवैधानिक हक्कां विषयी जागरूकता वाढली, ज्यामुळे वन हक्क आणि पेसा सारख्या कायद्यांची अंमल बजावणी प्रभावीपणे करण्याची मागणी जोरधरू लागली.

**ओळख आणि राजकीय सक्षमी करण:-**

**१. धुळे / नंदुरबार जिल्हा :-**

कै.श्री.बी.एस कोकणी माजी आमदार (साक्री) समाजातील प्रथम आमदार होण्याचा मान, श्री.रेश्मा मोतीराम भोये (माजी खासदार) धुळे लोकसभा, श्री.बापू हरी चौरे (माजी खासदार धुळे लोकसभा),श्री.गोविंद शिवराम चौधरी (माजी मंत्री आदिवासी विकास),श्री.रामदास रुपला गावित (माजी खासदार) धुळे लोकसभा, श्री.गोकुळ रुपला गावित ,श्री.वसंतराव दोधा सूर्यवंशी. (माजीआमदार) साक्री, श्री. धनाजी अहिरे मा.आमदार साक्री विधानसभा (काँग्रेस), श्री.योगेश रेश्मा भोये (माजी आमदार) साक्री कै.श्री.साहेबराव सुकराम बागुल माजी आमदार साक्री, सौ.मंजुळताई तुळशीराम गावित (महापौर मनपा धुळे) आमदार साक्री विधानसभा

**२. नाशिक, ठाणे, पालघर जिल्हा :-**

श्री.जीवा पांडू गावित -माकप कळवण, श्री.नरहरी झिरवाळ - राष्ट्रवादी काँग्रेस दिंडोरी (विधानसभा अध्यक्ष), श्री.ए.टी.पवार माजी आमदार , श्री.हरिचंद्र चव्हाण,श्री.धनराज महाले सौ.भारती पवार (माजी जिल्हा परिषद अध्यक्षा ) केंद्रीय मंत्री आरोग्य राज्यमंत्री. भारत सरकार मा.श्री.सुनील चंद्रकांत भुसारा आमदार विक्रमगड विधानसभा.

गुजरातमध्ये राजकीय प्रतिनिधित्वाचे स्वरूप: ही जमात प्रामुख्याने दक्षिण गुजरातमध्ये (जिल्हे जसे की वलसाड, डांग, नवसारी, तापी) आढळते आणि या भागातील आदिवासी आरक्षित जागांवर त्यांचे उमेदवार निवडून येतात.लोकसभा आणि विधानसभा: वलसाड, नवसारी यांसारख्या लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांमध्ये कोकणा समाजाचे मतदार निर्णायक ठरतात आणि तेथून त्यांचे प्रतिनिधी विधानमंडळात पोहोचतात.

आदिवासी कोकणा, कोकणी, कुकणा जमात वैचारिक व सांस्कृतिक एकता महासंमेलन व २०२३ चे महासंमेलन: हे संमेलन 2023 मध्ये नांदुरी (वणी), तालुका कळवण, जिल्हा नाशिक येथे आयोजित करण्यात आले होते. उद्देश: या महासंमेलनाचा मुख्य उद्देश आदिवासी कोकणा, कोकणी आणि कुकणा जमातींमध्ये वैचारिक आणि सांस्कृतिक एकता (Cultural Unity) निर्माण करणे हा असतो.दुसरे महासंमेलन २०२५ जव्हार येथे: कोकणा, कोकणी, कुकणा जमातींमध्ये वैचारिक आणि सांस्कृतिक एकता वाढवणे.

अनुसूचित जमातीचा दर्जा:– भारतीय संविधानात अनुसूचित जमाती (ST) म्हणून काही आदिवासी समुदायांना विशेष दर्जा देण्यात आला आहे, ज्याची व्याख्या कलम ३६६ (२५) मध्ये दिली आहे आणि राष्ट्रपती कलम ३४२ नुसार राज्यांच्या शिफारशीवरून या जमातींची यादी अधिसूचित करतात, ज्यामुळे त्यांना शिक्षण, नोकरी आणि इतर क्षेत्रांत विशेष फायदे व संरक्षण मिळते, जसे की आरक्षणाची तरतूद कलम १५(४) मध्ये आहे. संविधानातील तरतुदी: कलम ३६६ (२५): अनुसूचित जमाती म्हणजे अशा आदिवासी जमाती किंवा त्यांचे गट, ज्यांना संविधानाच्या उद्देशांसाठी कलम ३४२ अंतर्गत 'अनुसूचित' म्हणून गणले जाते.कलम ३४२: राष्ट्रपतींना कोणत्याही राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या संदर्भात अनुसूचित जमातींची यादी अधिसूचित करण्याचा अधिकार या कलमांतर्गत मिळतो, यासाठी संबंधित राज्याच्या राज्यपालांशी सल्लामगास केला जातो. कलम १५(४): हे कलम

राज्याला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांसाठी (यात STs चा समावेश आहे) विशेष तरतुदी (जसे की शैक्षणिक संस्थांमध्ये जागा राखीव ठेवणे) करण्याची परवानगी देते.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वाढता सहभाग:- पेसा (PESA) कायद्याने दिलेल्या अधिकारांमुळे आणिकोकना, कोकणी, कुकना आरक्षणांमुळे समाजाचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग लक्षणीय रीत्या वाढला आहे: ग्रामपंचायत आणि पंचायत समिती ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांमध्ये प्रतिनिधी निवडून आल्यामुळे स्थानिक पातळी वरील निर्णय प्रक्रियेत त्यांचा थेट सहभाग वाढला आहे.या सहभागामुळे समाजात नवीन नेतृत्व उदयास आले आहे, जे आपल्या समाजाच्या समस्या (उदा. पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण) स्थानिक पातळीवर प्रभावीपणे मांडू शकतात .वना अधिकार अंमल बजावणी स्थानिक स्वराज्य संस्थां मधील प्रतिनिधींमुळे 'वन हक्क कायद्या'ची (FRA) आणि पेसा कायद्याची अंमल बजावणी अधिक प्रभावी पणे करण्याची मागणी जोरधरू लागली.

**७. अभ्यासातील निष्कर्ष (Findings)**

कोकणा आदिवासी जमात ही समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेली जमात आहे. आधुनिकतेच्या प्रभावामुळे त्यांच्या जीवनशैलीत बदल होत असले तरी पारंपरिक मूल्ये आजही टिकून आहेत. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधी वाढवणे आवश्यक आहे. कोकणा, कोकणी, कुकणा जमाती मध्ये ४० टक्के लोकजवळ जमीन नाही. त्यामुळे हगामनुसार स्थालातर मोठ्या होते. मोल मजुरी कामे नगन्न मंजूरी आहे. जातीचे दाखले नाहीत .तसेच जंगलात महुफुले गोळा करणे. उत्पन्न कमी ते ही हगामानुसार असते. व्यासनाधीनता तरुणात मोठया प्रमाणात आहे. बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे. बोगस आदीवासी प्रमाण वाढले असुन अनेक नोकऱ्यां त्यांनी बालकल्या आहेत. सरकरला माहिती असुन कारवाया होत नाहीत. उच्च न्यायालयाने कोकणा आदिवासी जमातीच्या अदेशा दिले आहेत. कोकणा आदिवासी जमात ही समृद्ध वारसा असून प्रगती नाही . लोकसंख्या १० असूनही एकूण लोकसंख्या शेकडा प्रमाण ९.४० टक्के तर जागा फक्तं ७ टक्के असूनही बोगस आदीवासी प्रमाण वाढले आहे. पुढील काळात अनेक स्वतंत्र आदीवासी जिल्हे होतील.

**संदर्भ**

१. डॉ.गोविंद गारे-‘बदलाच्या उंबरठ्यावरील कोकणा आदिवासी,’श्रीविद्या प्रकाशन, पुणे-२०१४.
२. डॉ.गोविंद गारे- महाराष्ट्रातील आदिवासी जमाती सामाजिक व सांस्कृतिक मागोवा- मिहाना पब्लिकेशन्स,२०१४.
३. डॉ. गोविंद गारे -आदिवासी विकासातील दीपस्तंभ - आदिवासी’-श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २०१४.
४. डॉ.गोविंद गारे- - आदिवासी लोकनृत्य लय, ताल आणि सूर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन ,२०२४
५. डॉ.गोविंद गारे- - आदिवासी लोककथा -कॉन्टिनेन्टल प्रकाशन,2003.
६. डॉ.गोविंद गारे-'आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ' -सुगावा प्रकाशन-२०२४
७. डॉ.गोविंद गारे-''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन,२०१४.
८. प्रा. बी. ए. देशमुख-कोकणा-कोकणी इतिहास आणि जीवन, सुगावा प्रकाशन,२०२४.